पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.क्रिडा समिती
कार्यपत्रिका क्रमांक :- ७
सभावृत्तांत

दिनांक :- २/१२/२००९ वेळ :- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक २/१२/२००९ रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.खेडकर घनशाम रामचंद्र - सभापती
२) मा.गणेश तुकाराम भोंडवे
३) मा.सुमनताई मधुकर पवळे
४) मा.आसवानी डब्बु
५) मा.थोरात एकनाथ दादा
६) मा.प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबु नायर
७) मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

याशिवाय मा.गायकवाड - सहा.आयुक्त,मा.चाकणकर - उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक : २) मनपाचे मुळ अंदाजपत्रकातील तरतुदीत वाढ करणेबाबत..
मा.प्रेमकुमार नायर,मा.राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : ३) मनपाचे सुधारीत क्रीडा धोरण ठरविणे व त्याकामी समिती नियुक्ती करणेस मान्यता देणेबाबत..मा.राजेंद्र काटे,मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव..

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक - मा.गणेश भोंडवे अनुमोदक - मा.राजेंद्र काटे

शुक्रवार दिनांक ११/१२/२००९ रोजी दुपारी १२.०० पर्यंत सभा तहकुब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

--------------

मा.सभापती : शुक्रवार दिनांक ११/१२/२००९ रोजी दुपारी १२.०० पर्यत सभा तहकूब करणेत येत आहे.

[खेडकर घनशाम रामचंद्र]
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.क्रिडा समिती
## कार्यपत्रिका क्रमांक :- ७
## सभावृत्तांत
## (दिनांक २/१२/२००९ ची तहकुब सभा)

दिनांक :- ११/१२/२००९ वेळ :- दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा समितीची दिनांक २/१२/२००९ ची तहकुब सभा शुक्रवार दिनांक ११/१२/२००९ रोजी दुपारी १२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.खेडकर घनशाम रामचंद्र - सभापती
२) मा.गणेश तुकाराम भोंडवे
३) मा.आसवानी डब्बु
४) मा.थोरात एकनाथ दादा
५) मा.प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबु नायर
६) मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

याशिवाय मा.शर्मा - आयुक्त,मा.डुंबरे - अति.आयुक्त, मा.कारचे, मा.गायकवाड - सहा.आयुक्त,मा.चाकणकर - उपनगरसचिव,मा.लोंढे - मुख्यलेखापाल,मा.जाधव - शिक्षणाधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------

दि.२१/१०/०९,४/११/०९ व १८/११/२००९ (दुपारी ३.४५ व ४.१५ ) रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक :- १५ विषय क्रमांक :- १
दिनांक :- ११/१२/२००९ विभाग - क्रिडा
सुचक :- मा.गणेश भोंडवे अनुमोदक :-मा.राजेंद्र काटे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/ग्रं/कावि/६४०/०९दि.१८/११/०९
विषय :- मनपा जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, देखभाल व यांत्रिक दुरुस्ती कामाचे दुस-या वर्षाचे दरांस मान्यता देणेबाबत..

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-

ठराव क्रमांक :- १६ विषय क्रमांक :- २
दिनांक :- ११/१२/२००९
सुचक :- मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक :-मा.राजेंद्र काटे
संदर्भ :-मा.प्रेमकुमार नायर,मा.राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, क्रीडा विभागाचे सन २००९ -२०१० चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१० - २०११ चे मुळ अंदाजपत्रक नुकतेच तयार करणेत आलेले आहे. सदर अंदाजपत्रकातील तरतुदी कमी पडत असल्याने, खालील प्रमाणे तरतुदीत वाढ करणे आवश्यक असल्याने

| अ.क्र | लेखाशिर्ष | सन २००९ - २०१० चे सुधारीत अंदाजपत्रकात केलेले तरतुद | दुरुस्ती केलेली सुधारीत एकुण तरतुद | सन २०१० - २०११ चे मुळ अंदाजपत्रकात केलेले तरतुद | दुरुस्ती केलेली सुधारीत एकुण तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| १ | महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा | ५०,००,०००/- | १,५०,००,०००/- | ५०,००,०००/- | २,००,००,०००/- |
| २ | व्यायाम शाळा साहित्य व फिल्म खरेदी | ५०,००,०००/- | १,००,००,०००/- | ५०,००,०००/- | २,००,००,०००/- |
| ३ | क्रीडा कला साहित्य खरेदी | १५,००,०००/- | २५,००,०००/- | २०,००,०००/- | २५,००,०००/- |
| ४ | सुधारीत क्रीडा धोरण राबविणे | ---- | --- | ---- | ५,००,००,०००/- |
| | एकुण र.रु. | १,१५,००,०००/- | २,७५,००,०००/- | १,२०,००,०००/- | ९,२५,००,०००/- |

क्रीडा विभागाचे सन २००९ - २०१० चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१० - २०११ चे मुळ अंदाजपत्रकात वरील प्रमाणे तरतुदीत वाढ करुन, अंदाजपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १७ विषय क्रमांक :- ३

दिनांक :- ११/१२/२००९

सुचक :- मा. राजेंद्र काटे अनुमोदक :-मा. प्रेमकुमार नायर

संदर्भ :-मा. राजेंद्र काटे,मा.प्रेमकुमार नायर यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे शालेय क्रीडा धोरण ठरविणेत आलेले आहे. परंतु सदर क्रीडा धोरण शालेय विद्यार्थ्यांशी संबंधित असून, पिंपरी चिंचवड शहरातील खेळाडुंकरिता सुधारीत क्रीडा धोरण ठरविणे आवश्यक आहे. तसेच हे क्रीडा धोरण ठरविणेकामी समिती नेमुन या समितीमध्ये मा.घन:शाम खेडकर,अध्यक्ष क्रीडा समिती, मा.बाबू नायर,सदस्य क्रीडा समिती, मा.डब्बु आसवाणी, उपमहापौर तथा सदस्य,क्रीडा समिती, श्री.हनुमंत गावडे, श्री.मनोज देवळेकर, श्री.गोपाल देवांग, श्री.किरण सुवर्णा, श्री.मधु देसाई, श्री.राजू घुले, श्री.मिकी ॲगनर या पदाधिकारी, क्रीडा पटू, क्रीडा संघटक याची नियुक्ती करणे आवश्यक असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे पिंपरी चिंचवड शहरातील खेळाडुंकरिता सुधारीत क्रीडा धोरण ठरविणेस, तसेच हे क्रीडा धोरण ठरविणेकामी समिती नेमुन या समितीमध्ये मा.घन:शाम खेडकर, अध्यक्ष क्रीडा समिती, मा.बाबू नायर,सदस्य क्रीडा समिती,मा.डब्बू आसवाणी, उपमहापौर तथा सदस्य क्रीडा समिती, श्री.हनुमंत गावडे, श्री.मनोज देवळेकर, श्री.गोपाल देवांग, श्री.किरण सुवर्णा, श्री.मधु देसाई, श्री.राजु घुले, श्री.मिकी ॲगनर या पदाधिकारी, क्रीडा पटू,क्रीडा संघटक यांची नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

[खेडकर घनशाम रामचंद्र]
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/९/कावि/ १४०६ /२००९
दिनांक :- ११ / १२ /२००९

सही/-
उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८

प्रत :- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.